# डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर.

## विद्यापीठ उद्यान अंतर्गत असणाऱ्या आंबा फळांचा जाहीर लिलाव.

## परिपत्रक

सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, विद्यापीठ उद्यान अंतर्गत विद्यापीठ परिसरातील आंबा फळबागेतील फळांचा जाहीर लिलाव आहे त्या स्थितीत करण्याचे निश्चित केले आहे.

दिनांक,२४/०३/२०२६ रोजी दुपारी ३:०० वाजता विद्यापीठ परिसरातील आंबा फळांचा जाहीर लिलाव विद्यार्थी विकास विभाग येथील हॉल मध्ये करण्यात येईल. ज्यांना सदरील जाहीर लिलावात भाग घ्यावयाचा असेल त्यांनी लिलावापुर्वी विद्यापीठ उद्यान आंबा लिलाव अनामत रक्कम रू.५०,०००/- लेखा विभाग येथे ऑनलाईन पध्दतीने किंवा बँक ऑफ महाराष्ट्र विद्यापीठ शाखा येथे खाते क्र. २००६०५००१४० मध्ये रक्कम भरून विद्यापीठ लेखा विभाग येथे पावती घ्यावी व पावतीची छायांकीत प्रत तसेच आधार कार्डची छायांकीत प्रत सोबत जोडून ती पावती विद्यापीठ उद्यान विभाग येथे जमा करावी. पावती जमा केल्याशिवाय लिलावात भाग घेता येणार नाही.

जाहीर लिलावातील अटी व नियम सोबत जोडले आहेत.

संदर्भ क्र. विद्यापीठ उद्यान/आंबालिलाव/२०२५-२६/646 ते 725,
दि.18/03/2026

कुलसचिव

## डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर.
## विद्यापीठ उद्यान अंतर्गत असलेल्या आंबा फळांचा जाहीर लिलाव
## जाहीर लिलावाच्या अटी व नियम खालीलप्रमाणे आहे.

१) महाराष्ट्र नागरी सेवा नियमानुसार शासकीय/निमशासकीय सेवेतील कर्मचाऱ्यांना जाहीर लिलावात भाग घेता येणार नाही.

२) विद्यापीठ परिसरातील आंबा फळांच्या जाहीर लिलावात भाग घेण्यासाठी विद्यापीठ आंबा लिलाव अनामत रक्कम रू.५०,०००/-फक्त लेखा विभागात ऑनलाईन पध्दतीने भरावी लागेल किंवा बँक ऑफ महाराष्ट्र विद्यापीठाच्या बँक खात्या मध्ये भरावी लागेल.

३) जो बोलीधारक लिलाव घेईल त्याची अनामत रक्कम रू.५०,०००/- ही लिलावाच्या अंतिम बोलीतील रकमेतून वजा करण्यात येईल, उर्वरीत अंतिम बोलीची रक्कम लिलाव धारकास लेखाविभागात ऑनलाईन पध्दतीने भरावी लागेल किंवा बँक ऑफ महाराष्ट्र विद्यापीठ शाखा येथे जाऊन विद्यापीठाच्या बँक खात्यामध्ये भरावी लागेल.

४) भरलेल्या अनामत रक्कमेच्या पावती सोबत अधार कार्डची छायांकीत प्रत जोडल्याशिवाय बोली बोलता येणार नाही, व लिलावात भाग घेता येणार नाही.

५) लिलावास प्रारंभ करताना कमीत कमी रू.५०,०००/- पासून प्रारंभ करावा ही बोली रू.५०००/- पटीत असावी.

६) जाहीर लिलावात ज्यांची बोली मान्य होईल त्यांना फळझाडांची देखभाल व सरंक्षण स्वतः करावे लागेल, लिलाव घेतल्यानंतर फळांचे कोणत्याही प्रकारचे नुकसान झाल्यास विद्यापीठ जबाबदार राहणार नाही व लिलावात भरलेली पूर्ण रक्कम कोणत्याही सबबीखाली परत केली जाणार नाही.

७) जाहीर लिलावातील बोलीची पूर्ण रक्कम व झाडांची सुरक्षा ठेव रक्कम रू.१०,०००/- लेखा विभागात भरावे लागतील त्यानंतरच फळबागेचा ताबा दिला जाईल.

८) प्रथम बोलीधाराकाने लिलावातील बोलीची पूर्ण रक्कम भरे पर्यंत द्वितीय बोलीधारकाची अनामत रक्कम परत केली जाणार नाही.

९) झाडांना काही इजा पोहचल्यास किंवा झाडांचे काही नुकसान झाल्यास रू.१०,०००/- सुरक्षा रक्कम कपात केली जाईल.

१०) आंबा फळझाडांचा माल संपल्यानंतर विद्यापीठ उद्यानाकडे भरलेली सुरक्षा रक्कम रू.१०,०००/- कक्षअधिकारी (उद्यान) विद्यापीठ उद्यान यांचा अभिप्राय मिळाल्याशिवाय पैसे परत मिळणार नाही.

११) बोलीधारकाची अनामत रक्कम रू.५०,०००/- तसेच लिलावधारकाची सुरक्षा रक्कम रू.१०,०००/- ही RTGS द्वारेच परत केली जाईल.

१२) आंबा फळबाग शेतीमध्ये इतर पीके घेता येणार नाहीत. लिलाव धारकास आंबा विक्री साठी स्टॉल हवा असल्यास यासाठी रू.५०००/- भरावे लागतील ही रक्कम परत मिळणार नाही, स्टॉल साठी जागा ही मुख्य रस्त्यावरील सुरक्षा रक्षक कॅबीन जवळ दिली जाईल रहदारीस अडथळा येणार नाही याची काळजी घ्यावी लागेल.

१३) प्रथम क्रमांक बोलीधारकाने जाहीर लिलावाचा दिवस सोडून पुढील तीन दिवसाच्या आत लिलावात निश्चित झालेली पुर्ण रक्कम न भरल्यास प्रथम क्रमांक बोलीधारकाची अनामत रक्कम रू.५०,०००/- जप्त करण्यात येईल.

१४) प्रथम बोलीधारकाची अनामत रक्कम जप्त केल्यानंतर द्वितीय बोलीधारकास जाहीर लिलाव देण्यात येईल. द्वितीय बोलीधारकाने दिलेल्या वेळेत लिलावातील रक्कम न भरल्यास त्याची अनामत रक्कम रू.५०,०००/- जप्त करून विद्यापीठ नियमाप्रमाणे कारवाई करण्यात येईल.

१५) ज्यांनी आंबा फळांचा लिलाव घेतला त्यांचा कालावधी हा घेतलेल्या कालावधीपासून मालाचा उठाव होईपर्यंत किंवा ३० जुन २०२६ पर्यंत राहील अथवा सद्याचा एकच फळबहार राहील, ही अट बंधनकारक असेल.

१६) आंबा फळबागेस विहीरीतील उपलब्ध पाणी दिले जाईल, गरज भासल्यास आंबा लिलावधारकाने आंबा फळझाडांना पाणी उपलब्ध करून देणे व पाणी देणे हे काम स्वतःच्या जबाबदारीने करावे लागेल.

१७) लिलाव धारकास स्टॉलवर लाईट हवी असल्यास सबमीटर आणून द्यावे लागेल व वापरलेल्या विजेचे बील भरावे लागेल.

१८) लिलावातील बोलीची अपेक्षीत किंमत न मिळाल्यास ती मान्य अथवा अमान्य करण्याचा अधिकार विद्यापीठाने राखून ठेवला आहे.

कुलसचिव